Historicity researcH Journal

# महाराष्ट्रातील हरितक्रांतीचे प्रणेते- वसंतराव नाईक




**प्रा. डॉ. शिवाजी वाघमोडे**
**इतिहास विभाग प्रमुख, भारत महाविद्यालय, जेऊर ता. करमाळा.**
**Email :dr.wshivaji@gmail.com**

## प्रस्तावना:

भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया शेती असून शेतीच्या भरभराटीवरच इतर उद्योग धंद्यांची भरभराट आणि राष्ट्राची समृद्धी अवलंबून आहे. शेती व शेतकरी या दोहोंचीही प्रगती झाली पाहिजे यासाठी महाराष्ट्रातील काही द्रष्टे नेते प्रयत्नशील राहिले. त्या नेत्यांच्या श्रेयनामावलीत वसंतराव नाईक यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते . 'शेती यंत्रणे आणि तंत्रने होणार नाही आणि मंत्रानेही होणार नाही. शेतीत गाडून घेतल्या शिवाय ती फुलत नाही. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाच्या खुर्चीत मी बसलेलो असलो तरी देखील मी शेतीच्या बांधावरच बसलेलो आहे. असे ते नेहमी म्हणत असत. शेती आणि ग्रामीण भागाशी एवढी घट नाळ जोडलेला मुख्यमंत्री भारतीय हरितक्रांतीच्या काळात महाराष्ट्राला लाभल्यामुळे हरितक्रांतीमध्ये महाराष्ट्र राज्य मोठे योगदान देऊ शकले. धरतीच्या कणाकणातून समृद्धी फुलली पाहिजे हा त्यांचा उत्कट ध्यास होता. काळ्या मातीचे हिरवे स्वप्न साकार करणारा हा खरा भूमिपुत्र होता. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर एवढ्या प्रदीर्घ काळ मुख्यमंत्रीपद भूषविणारी ते एकमेव मुख्यमंत्री होते. सन १९६३ ते १९७५ या ११ वर्षांच्या कालखंडात वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राला सर्वांगाने सक्षम बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी प्रामुख्याने कृषी व कृषीपूरक उद्योगांकडे विशेष लक्ष दिले. महाराष्ट्रात पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर दिला. याच काळात राष्ट्रीय स्तरावर जी हरितक्रांती होत होती तीला मूलभूत आधार देण्याचे कार्य वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राच्या कृषी विकासाच्या माध्यमातून केले होते. प्रस्तुत शोधनिबंधातू महाराष्ट्रातील हरितक्रांतीमध्ये वसंतराव नाईक यांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये:

१) महाराष्ट्रातील कृषी विकासात वसंतराव नाईक यांच्या कार्याचा आढावा घेणे.
२) महाराष्ट्रातील हरित क्रांतीचे प्रणेते म्हणून वसंतराव नाईक यांचे योगदान स्पष्ट करणे.

अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून कृषी संस्थेच्या माध्यमातून अन्नधान्य उत्पादन वाढवून अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठीच्या धोरणाला हरित क्रांती असे म्हणतात. भारतामध्ये डॉ.एम.एस.स्वामिनाथन यांना हरित क्रांतीचे जनक म्हणून ओळखले जाते. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या कृषी विकासाचे जनक आणि महाराष्ट्रातील हरित क्रांतीचे प्रणेते म्हणून वसंतराव नाईक यांना ओळखले जाते. वसंतराव नाईक यांचे

महाराष्ट्राच्या कृषी विकासात जे बहुमोल योगदान आहे ते चिरस्मरणीय रहावे म्हणून १ जुलै हा वसंतराव नाईकांचा जन्म दिवस ममहाराष्ट्रात 'कृषि दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

शेकडो वर्षापासून पारंपरिक व जुनाट पद्धतीने चालत असलेला शेती व्यवसाय आधुनिक पद्धतीने केला जावा. शेतीला तंत्रज्ञानाची जोड मिळावी. शेती विज्ञाननिष्ठ व शास्त्रीय पद्धतीने केली जावी. उत्पादन वाढ व्हावी. ओढे, नालेनाले, नद्यांद्वारे समुद्राला वाहून जाणारे पाणी शेतीसाठी वापरता यावे, सिंचन सुविधा वाढवून दुबार पिके घेऊन उत्पादनात वाढ व्हावी यासाठी वसंतराव नाईक यांनी विशेष प्रयत्न केले. शेतकर्यांनी शेती आधुनिक पद्धतीने करावी, संकरीत बी-बियाण्यांची पेरणी करून राज्याला व पर्यायाने देशाला अन्नधान्य टंचाईच्या संकटातून बाहेर काढावे असे कळकळीचे आवाहन वसंतराव नाईकांनी आपल्या सभा भाषणांमधून सातत्याने केले. ते इतरांना आवाहन करूनच थांबले नाहीत तर स्वतःच्या शेतीमध्ये संकरीत बियाण्यांची मोठ्या प्रमाणात लागवड केली. आधुनिक अवजारे व संकरीत बियाण्यांचे वाण शेतकर्यांच्या शेतीपर्यंत पोचविण्यासाठी त्यांनी शासकीय यंत्रणा सुयोग्य पद्धतीने वापरली. त्यामुळे अल्पावधीतच महाराष्ट्रातील शेतीचे चित्र पालटले गेले. प्रारंभी केवळ १०० एकर जमीन संकरीत बियाणांच्या लागवडीखाली होती, ती अल्पवधीतच ५०००० एकरांच्या पुढे गेली आणि मग हे प्रमाण सतत वाढतच राहिले.

भारतीय शेतीच्या विकासाकडे ब्रिटिश राजवटीत दुर्लक्ष झाले होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय जनतेला अन्नधान्य पुरवठा करण्यात सरकार कमी पडत होते. त्यातच शेजारी राष्ट्रांशी युद्ध उद्भवल्याने परिस्थिती अधिकच बिकट बनली होती. भारताचे पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांनी त्या काळात 'जय जवान, जय किसान' असा नारा देऊन देशामध्ये कृषी क्रांतीची ज्योत पेटली होती. ती ज्वोत सतत तेवत ठेवण्याचे काम वसंतराव नाईक यांनी केले. निराशेच्या अंधकारात अचेतन बनलेल्या शेतकर्यांना चेतना देऊन महाराष्ट्रामध्ये कृषिविकास घडवून आणण्याचे काम वसंतराव नाईक यांनी केले. त्यामुळेच त्यांना महाराष्ट्रातील हरित क्रांतीचे प्रणेते असे संबोधले जाते, ते सर्वार्थाने योग्य आहे.

महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचे श्रेय वसंतराव नाईक यांना जाते. महाराष्ट्राला अन्नधान्य स्वयंपूर्ण करण्यासाठी त्यांनी खालील बाबींवर विशेष भर दिला.

शेती अधिक समृद्ध होण्यासाठी बियाणांचे नव नवीन वाण, आधुनिक तंत्रज्ञानाची गरज लक्षात घेऊन वसंतराव नाईक यांनी कृषी विद्यापीठांची स्थापना केली. सन १९६८ मध्ये राहुरी कृषी विद्यापीठ सन १९६९ मध्ये अकोला येथे आणि सन १९७२ साली दापोली व परभणी या ठिकाणी कृषि विद्यापीठे स्थापन झाली. एकाच राज्यात एकाच मुख्यमंत्र्याच्या कारकीर्दीत चार कृषी विद्यापीठांची स्थापना होणे ही संपूर्ण भारताच्या इतिहासातली एकमेव घटना आहे. शेतकऱ्यांना रासायनिक खते व सेंद्रिय खते यांचा वापर करण्यास नाईक यांनी प्रोत्साहित केले. रासायनिक खतांसाठी अनुदान देण्याचे स्विकारले. खताच्या पुरवठ्यात अडचणी येऊ नयेत म्हणून केंद्र सरकारकडून अधिक प्रमाणात खत मिळवण्यासाठी वसंतराव नाईक नेहमी प्रयत्नशील असत. महाराष्ट्र राज्याच्या कोटय़ाखेरीज इतर राज्याने खताचा जर काही कोटा सोडला तर तो आम्हाला दयावा. आम्ही तो घेण्यास तयार आहोत, आशी पूर्व मागणी ते केंद्र सरकारकडे करत असत.

महाराष्ट्रमध्ये महाबीज बियाणे उत्पादक महामंडळ १९७६ साली स्थापन झाले असले तरी १९७२ पासूनच वसंतराव नाईकांनी या महामंडळाच्या उभारणीसाठी प्रयत्न केले होते. त्यासाठी १० कोटी रुपये भागभांडवल उभारून महाबीज स्थापनेची व्यवस्था त्यांनी केली होती.सन १९६५ च्या सुमारास महाराष्ट्रामध्ये १६ लाख टन अन्नधान्याची तूट होती. ती तूट भरून काढण्यासाठी आपणास दुबार पिके घेणे व दुबार

पिकासाठी शेतीला पाणीपुरवठेच्या सुविधा उपलब्ध करणे हा एकमेव मार्ग असल्याचे वसंतराव नाईकांना समजले होते. सैन्य आघाडीला जर जवान कमी पडले तर ते आपणास दुसरे पाठवता येतील परंतु शेतीवर उपजीविका असणार्या ३० कोटी जनतेची शेती आघाडी जर कोसळली तर ती आपणास कधीही सांभाळता येणार नाही. असे त्यांचे मत होते. शेतकर्यांना पाणी मिळाले की, शेतकरी चमत्कार करुन दाखवतो असे ते नेहमी म्हणत असत. त्या दृष्टीने गाव खेड्यातील छोटे छोटे ओढे, नाले नादया यातील पाणी व्यर्थ वाहून जाऊ न देता बंधारे घालून आडवले पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यासाठी त्यांनी पद्धतशीर योजना आखून त्या योजनांची अंमलबजावणी केली.

दोन वर्षात महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याच्या हेतूने वसंतराव नाईक यांनी ऑक्टोबर १९६५ मध्ये १२ कलमी योजना आखली. त्यातून शेतकर्यांना कृषीपंप, बैलजोड्या, नांगर इत्यादी साहित्य पुरवले गेले. उपलब्ध पाण्याचे योग्य पद्धतीने नियोजन करण्यात आले. वेगवेगळ्या नदीखोऱ्यातील पाण्याचे योग्य व्यवस्थापन करण्यात आले.वसंतराव नाईक यांनी शेतीला पूरक असणारे इतर व्यवसाय देखील भरभराटीस आणण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये दुग्धोत्पादन, कुकुटपालन आदींचा उल्लेख करता येईल.संकरित गाईंच्या संगोपनाने महाराष्ट्र व देशाच्या दुधाचा प्रश्न सोडवता येईल हे ओळखून वसंतराव नाईक यांनी कुणाचे विरोधाला न जुमानता महाराष्ट्र संकरित गाईंचा विकास करण्याच्या दृष्टीने पावले उचलली. ग्रामीण भागात विद्युतीकरण केल्यामुळे शेती पंपांना वीजपुरवठा होऊ लागला.

सन १९७२ सालच्या दुष्काळात त्यांनी अभूतपूर्व असे काम केले. सलग ३ वर्ष अवर्षणाचे असल्याने नागरीकांच्या आणि जनावरांच्या अन्नाचा व पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. अशा वेळी त्यांनी रोजगार हमी योजना सुरू केली. तीच्या माध्यमातून सुमारे सात हजारांपेक्षा अधिक विहिरी खोदल्या गेल्या. मध्यम धरणे छोटे कालवे, तलाव आदी काम पूर्ण केली. त्यातून ग्रामीण भागातील पन्नास लाख पेक्षा अधिक लोकांना रोजगार मिळाला आणि त्यासोबतच ग्रामीण शेती सिंचन क्षेत्रात वाढ होण्यास हातभार लागला. वसंतराव नाईक यांनी सुरू केलेली रोजगार हमी योजना पुढे संपूर्ण देशात स्वीकारली गेली. आजही ती मनरेगा या नावाने सुरु आहे.

## निष्कर्ष:

वसंतराव नाईक यांनी आपल्या १९५२ ते १९७९ या २७ वर्षांच्या राजकीय कार्यकाळात शेतीविषयक अनेक महत्त्वपूर्ण योजना राबविल्या. पुण्यातील शनिवार वाड्यापुढील सभेत त्यांनी 'दोन वर्षात महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवेल' असे धाडसी उद्गार काढले होते, ते त्यांनी पूर्णत्वास नेले.महाराष्ट्राच्या राजकारणात आणि शेतीकारणात वसंतराव नाईक यांना वजा करून काहीही लिहिता येणार नाही आणि बोलताही येणार नाही. वसंतराव नाईक हे सलग ११ वर्ष महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांनी आमदार, खासदार, मंत्री मुख्यमंत्री अशी विविध पदे अनुभवली व प्रदीर्घकाळ महाराष्ट्राचे राजकारण पाहिले. असे असले तरी शेती आणि शेतकरी हा त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता.

## संदर्भ:

१) भावे मधुकर, विकासाचा महानायक, लोकराज्य अंक १ जुलै २०१२, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
२) साठे वसंत, महाराष्ट्राचे वसंत वैभव, जनता शिक्षण प्रसारक मंडळ, पुसद, १९९२

३) रूद्रवार उत्तम, महाराष्ट्राचे शिल्पकार- वसंतराव नाईक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २००४

४) रासबिहारीसिंह बायस संपा., वसंतराव नाईकांचे जीवनचरित्र

५) राठोड राजाराम, हिरवी क्षितिजे, वर्षा प्रकाशन, औरंगाबाद, १९८०